**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)**

**बुधवार, दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२४**

**ठळक बातम्या**

1. **दहशतवाद आणि दहशतवादाला आर्थिक मदत करणाऱ्यांचा सामना करण्यासाठी ब्रिक्स राष्ट्रांना एकत्र येण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं शिखर परिषदेत आवाहन.**

2. **राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी -अजित पवार गटातर्फे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर; शिवसेना शिंदे गटाची यादी देखील प्रसिद्ध.**

3. **निवडणूक आयोगातर्फे विधानसभा मतदार संघनिहाय निवडणूक निरीक्षक आणि खर्च निरीक्षकांची नियुक्ती.**

4. IIM **नागपूर इथं 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' विषयावरील एक दिवसीय पश्चिम विभागीय परिषदेचं आयोजन.**

#####

**ब्रिक्स**

**दहशतवाद आणि दहशतवादाला आर्थिक मदत करणाऱ्यांचा सामना करण्यासाठी ब्रिक्स राष्ट्रांना एकत्र येण्याचं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज ब्रिक्स शिखर परिषदेत केलं. अशा गंभीर विषयावर दुटप्पी धोरणाला थारा नाही, असंही ते म्हणाले. कझान इथं 16 व्या ब्रिक्स शिखर परिषदेच्या सत्रात, मोदींनी तरुणांमधील कट्टरतावाद रोखण्यासाठी सक्रिय पावले उचलण्याच्या गरजेवर भर दिला. त्यांनी संयुक्त राष्ट्रातील आंतरराष्ट्रीय दहशतवादावरील व्यापक अधिवेशन घेण्याच्या प्रलंबित मुद्द्यावर एकत्र काम करण्याचं आवाहन केलं. सायबर सुरक्षा आणि अधिक सुरक्षित एआय तंत्रज्ञान याबद्दल जागतिक नियमांसाठी काम केले पाहिजे यावरही पंतप्रधानांनी प्रकाश टाकला.**

#####

**शिवसेना / मनसे / इतर यादी**

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीच्या राजकीय हालचालींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या जागावाटपाच्या वाटाघाटी शेवटच्या टप्प्यात असून चित्र लवकरच स्पष्ट होण्याची चिन्हं आहेत. शिवसेनेनं काल रात्री उशिरा ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुन्हा एकदा कोपरी-पाचपाखाडी**

मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असून येत्या सोमवारी ते अर्ज दाखल करणार आहेत. तर विदर्भातील बुलढाणा मतदारसंघातून संजय गायकवाड, बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर इथून डॉक्टर संजय रायमुलकर, अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर मतदारसंघातून अभिजीत अडसूळ, रामटेक मतदारसंघातून आशिष जयस्वाल, भंडारा इथून नरेंद्र भोंडेकर तर यवतमाळ जिल्ह्यातील दिग्रस मतदारसंघातून संजय राठोड यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

दरम्यान, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनंही ४५ उमेदवारांची दुसरी यादी काल प्रसिद्ध केली. पक्षाचे प्रमुख राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे यांना माहिम मधून मनसेनं उमेदवारी दिली आहे. त्यांच्यासमोर विद्यमान आमदार आणि शिवसेनेचे नेते सदा सरवणकर यांचं आव्हान असणार आहे. महाविकास आघाडीचा भाग असलेल्या शेतकरी कामगार पक्षानंही काल, अलिबाग, पनवेल, उरण, पेण आणि सांगोला या पाच जागांवर उमेदवारांची घोषणा केली. भारतीय कम्युनिस्ट पक्षानं शीव-कोळीवाडा मतदारसंघातून विजय दळवी यांना उमेदवारी दिली आहे.

#####

अजित पवार राष्ट्रवादी यादी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी -अजित पवार गटातर्फे विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली आहे. अजित पवार हे बारामती मधून निवडणूक लढविणार आहे तर नाशिक जिल्ह्यातील येवला इथून छगन भुजबळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर दिंडोरी मतदार संघातून नरहरी झिळवळ, निवडणूक लढवतील. विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी मतदार संघातून धर्मराव बाबा आत्राम यांना उमेदवारी देण्यात आली आहे. अमरावती शहर मतदार संघातून सुलभा खोडके यांना, पुसद इथून इंद्रनील नाईक तर तुमसर इथून राजू कारेमोरे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. या यादीत माजी मंत्री राजकुमार यांना गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव मतदारसंघाचं तिकीट जाहीर करण्यात आलं आहे. राजकुमार बडोले यांनी काल अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला होता.

#####

अर्जाची उचल

भंडारा जिल्ह्यातील विधानसभेच्या तीन जागांसाठी कालपासून नामांकन भरण सुरू झाल आहे. नामांकनाच्या दुसऱ्या दिवशी आज भंडारा विधानसभा क्षेत्रासाठी 57, साकोली मध्ये 18 अर्ज, तुमसर मध्ये 30 अर्ज असे एकूण 105 अर्ज उचलण्यात आले.

चंद्रपूर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात एकही नामांकन दाखल करण्यात आलेले नाही. तर आज  इच्छुकांकडून 174 अर्जांची उचल करण्यात आली.

गडचिरोली जिल्ह्यातील अहेरी विधानसभा मतदारसंघात एक अर्ज दाखल करण्यात आला आहे. अजय आत्राम यांनी अपक्ष उमेदवार म्हणून आपल नामनिर्देशनपत्र दाखल केल. तिन्ही विधानसभा क्षेत्रात दोन दिवसांत ९३ नामनिर्देशपत्रांची उचल झाली आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सात मतदारसंघापैकी  खामगांव विधानसभा मतदारसंघातून दोन नामनिर्देशनपत्र दाखल झाले आहे. दरम्यान आज एकूण 105 व्यक्तींनी 187 नामनिर्देशन अर्जाची उचल केली आहे.

#####

महंत सुनील महाराज

वाशीम जिल्ह्यातील  बंजारा समाजाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पोहरादेवीचे महंत सुनील महाराज यांनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेना पक्षाचा राजीनामा दिला आहे. महंत सुनील महाराज यांनी पत्राद्वारे हा निर्णय जाहीर केला आहे.

#####

‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज पालघर जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

#####

निवडणूक निरीक्षकांची / खर्च निरीक्षक नियुक्ती

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारत निवडणूक आयोगान नागपूर जिल्ह्याकरीता विधानसभा मतदार संघनिहाय निवडणूक निरीक्षकांची नियुक्ती केली आहे.

नागपूर पूर्व,  नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी भोर सिंग यादव, हिंगणा आणि उमरेड  अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघासाठी पवन कुमार सिन्हा, कामठी आणि रामटेक विधानसभा मतदारसंघासाठी सुनिल कुमार तर  काटोल आणि सावनेर विधानसभा मतदारसंघासाठी  नवीन कुमार सिंग यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या  निवडणूक निरीक्षकांची राहण्याची व्यवस्था रवी भवन इथं करण्यात आली असून निवडणुकीशी संबंधित बाबींसंदर्भात राजकीय पक्षाची, उमेदवारांची, नागरिकांची किंवा मतदाराची तक्रार असल्यास इथं  संपर्क साधण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

याशिवाय नागपूर जिल्हयाकरीता विधानसभा मतदार संघनिहाय निवडणूक खर्च निरीक्षकांची देखील नियुक्ती करण्यात आलेली आहे. काटोल, सावनेर, हिंगणा आणि उमरेड अनुसूचित जाती विधानसभा मतदारसंघासाठी देवरंजन मिश्रा, नागपूर दक्षिण पश्चिम, नागपूर दक्षिण, नागपूर पूर्व आणि नागपूर मध्य विधानसभा मतदारसंघासाठी संतोषकुमार मिश्रा तर नागपूर पश्चिम, नागपूर उत्तर, कामठी आणि रामटेक विधानसभा मतदारसंघासाठी दीपक आनंद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भंडारा विधानसभा मतदार संघाकरिता निवडणूक खर्च निरीक्षक अनिरूध्द यांची नियुक्ती केली आहे. ते निवडणूक निरीक्षक म्हणून देखील काम पाहतील.

दरम्यान निवडणूक खर्च निरिक्षक ज्ञानेंद्र कुमार त्रिपाठी यांनी वर्धा जिल्हयातील आर्वी विधानसभा मतदार संघातील आष्टी तालुक्यातील खडका येथील स्थीर निगराणी पथकास भेट देऊन मार्गदर्शन केलं. तसच निवडणूक प्रक्रियेबाबत उपविभागीय कार्यालय आर्वी इथं आढावा घेतला.

#####

आयआयएम

नागपूर येथील भारतीय व्यवस्थापन संस्था अर्थात IIM नागपूर (आयआयएम) यांनी आयोजित केलेल्या 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावरील एक दिवसीय पश्चिम विभागीय परिषदेचं उद्घाटन राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या दूरस्थ उपस्थितीत आज संपन्न झालं. या परिषदेला IIM नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष एम. जगदीश कुमार, विविध विद्यापीठांचे कुलगुरू, प्राचार्य तसच शिक्षण क्षेत्राशी निगडित मान्यवर उपस्थित होते. या परिषदेच्या माध्यमातून उच्च शिक्षणात नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून संभाव्य बद्दल आणि त्याची व्याप्ती वाढविण्यावर धोरणात्मक चर्चा व्हावी अशी अपेक्षा राज्यपालानी यावेळी व्यक्त केली.

#####

इफ्फी

आशियातील एक प्रमुख चित्रपट महोत्सव असलेला भारतातातील आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात इफ्फी यंदा गोव्यात 20 ते 28 नोव्हेंबर दरम्यान होणार आहे. यासाठी नावनोंदणी सुरू झाली आहे. या महोत्सवाचं यंदाचं हे 55 वं वर्ष आहे. चित्रपट रसिक इफ्फीच्या संकेतस्थळावर नावनोंदणी करू शकतात.

#####

सैनिकाचा अपघात

कुटुंबीयांची भेट घेत कर्तव्यावर रुजू होण्यासाठी जात असलेल्या जवानाचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना गौरनगर (वडसा) येथे घडली.खेमराज नान्हे वय ३२ वर्षे , रा. सावरी अस मृत जवानाच नाव आहे. खेमराज यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. खेमराजच्या मागे आई वडील, पत्नी राखी आणि ५ वर्षांचा मुलगा आहे. मूळ गाव सावरी इथं बंदुकीच्या 3 फैरी हवेत झाडून जवानाला मानवंदना देण्यात आली आणि शासकीय इतमातात अंत्यसंस्कार करण्यात आले.

#####

राज्यस्तरीय अधिवेशन

मुख्याध्यापक संघाचं एकसष्टावं राज्यस्तरीय अधिवेशन २८ आणि २९ डिसेंबर रोजी लातूरला होणार आहे. अखिल महाराष्ट्र माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संयुक्त मंडळाच्या राज्य कार्यकारिणीच्या लातूर मध्ये झालेल्या बैठकीत हा ठराव मंजूर करण्यात आला.

#####

हवामान

विदर्भातल्या सर्व जिल्ह्यांमध्ये आज पासून 29 ऑक्टोबर पर्यंत ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्रानं वर्तवली आहे. यादरम्यान कमाल तापमान 30 ते 34 अंशापर्यंत राहू शकतं. असा अंदाज देखील वर्तवण्यात आला आहे.

#####